हॅलो प्रभात

01.03.2025

# विवेकानंद महाविद्यालयात वादविवाद स्पर्धेचे आयोजन

कोल्हापूर : हॅलो प्रभात

विवेकानंद महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागात २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराष्ट्रीय विज्ञान दिवसफसाजरा करण्यासाठी वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या



विशेष कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र विभाग व अंतर्गत गुणवत्ता आश्वासन समितीच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

स्पर्धेत महाविद्यालयातील बीएससी भाग १,२, आणि ३ च्या विद्यार्थ्यांनी उत्साही व सक्रियपणे सहभाग घेतला. यावर्षीचे वादविवादाचे विषय अत्यंत आकर्षक होते. आधुनिक तंत्रज्ञान - शाप की वरदान? , पाळीव प्राणी जतन करणे योग्य की अयोग्य? आणि संशोधनात प्राण्यांचा उपयोग करणे योग्य की अयोग्य? विद्यार्थ्यांनी आपल्या विचारांची अत्यंत ठाम आणि प्रभावी मांडणी केली, ज्यामुळे स्पर्धा खूपच रोचक व आकर्षक ठरली.

या स्पर्धेत ३२ विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. परीक्षक म्हणून डॉ. सलमा मुल्ला यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या विचारांना गती दिली. स्पर्धेचे प्रात्यक्षिक डॉ. टी. सी. पाटील यांनी केले, तर कु. नम्रता जाधव यांनी आभार प्रदर्शन केले.

04/03/2025

हॅलो प्रभात

दि. 01.03.2025

# युवकांनी खेळाकडे आवड म्हणून पाहावे : दीनानाथ सिंह

## विवेकानंद कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

कोल्हापूर : हॅलो प्रभात

जुन्या काळातील कुस्ती आणि आजच्या काळातील कुस्तीमध्ये जमीन आस्मानचा फरक पडला असून युवकांनी खेळाकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून न पाहता आवड म्हणून खेळ जोपासले पाहिजेत. विवेकानंद कॉलेजने विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना नेहमीच प्रोत्साहन देऊन विविध व्यासपीठातून कोल्हापूरामध्ये क्रीडासंस्कृती रुजविली. विवेकानंद कॉलेजने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नामवंत खेळाडू तयार केले. मर्यादा लक्षात घेऊन एखादे क्षेत्र निवडल्यास यश नक्कीच मिळते.

ते पुढे म्हणाले, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी तीन दगडांच्या चुलीचा संस्कार करण्याऐवजी समाजाचा संसार सांभाळण्याचे काम प्राचार्य अभयकुमार साळुंखे करीत आहेत. असे प्रतिपादन सिंह यानी केले. ते विवेकानंद च्या वार्षिक पारितोषिक वितरण प्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी कार्याध्यक्ष मा.प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते. अध्यक्षीय मनोगतात साळुंखे यांनी,



विवेकानंद कॉलेजच्या गुणवंत विद्यार्थ्यांनी शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांनी सांगितलेल्या पंचसुत्रीचा अवलंब करुन महाविद्यालयाचा व संस्थेचा नावलौकिक वाढवावा. वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळते.

यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्राने गौरविण्यात आले. आदर्श विद्यार्थी प्रविण जामखंडे, आदर्श समृध्दी माने, आदर्श क्रीडा विद्यार्थिनी गायत्री लोळगे, आदर्श सुयश झुणके, आदर्श, प्रज्योत गायकवाड, आदर्श एन.सी.सी.कॅडेट समिधा घुगरे यांना शिष्यवृत्ती देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमास आय.क्यु.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, प्रा.संजय थोरात, डॉ. ई.बी.आळवेकर, डॉ.जी.जे.नवाथे, डॉ. आरिफ महात, मेजर सुनिता भोसले, लेफ्टनंट जे आर भरमगोडा, प्रा.सौ. शिल्पा भोसले, प्रा.विश्वंभर कुलकर्णी, प्रा. एम.आर.नवले, प्रा.गीतांजली साळुंखे, प्रा.के.जे.गुजर, प्रा समीर पठाण, प्रा.प्रशांत कांबळे, हितेंद्र साळुंखे, रजिस्ट्रार आर.बी.जोग तसेच प्राध्यापक, प्रशासकीय सेवक वर्ग व विद्यार्थी,विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

03/03/25

पुढारी MY कोल्हापूर शनिवार, १ मार्च २०२५

# 'विवेकानंद'मध्ये वादविवाद स्पर्धेस प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. याला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. परीक्षक म्हणून डॉ. सलमा मुल्ला यांनी काम पाहिले. स्पर्धेचे प्रात्यक्षिक डॉ. टी. सी. पाटील यांनी केले. नम्रता जाधव यांनी आभार मानले. प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे नियोजन करण्यात आले.

# सतीश तांदळे यांची अभ्यास मंडळावर निवड

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



युवा लेखक, अभिनेता व दिग्दर्शक सतीश सदाशिव तांदळे यांची विवेकानंद महाविद्यालयाच्या अभ्यास मंडळावर सदस्य म्हणून निवड केली आहे. इंग्रजी भाषा व साहित्य या विषयावरील अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी या मंडळावर राहणार आहे. ते इंग्रजीतील प्रसिद्ध साहित्याचे मराठी भाषेत नाटक, एकांकिका याद्वारे सादरीकरण करत असतात. राज्य नाट्य स्पर्धेत त्यांनी दिग्दर्शित केलेल्या संगीत 'मतिविलय' या नाटकाला प्रथम क्रमांक मिळाला आहे.

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ३ मार्च २०२५

P
03/2025

# 'विवेकानंद'चे वक्तृत्व, सुगम गायन, चित्रकला स्पर्धेत यश

कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या वतीने नागठाणे येथे शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे राज्यस्तरीय स्पर्धा झाल्या. यामध्ये विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थी, विद्यार्थिनी व शिक्षकाने यश संपादन केले. यामध्ये राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेमध्ये वेदिका मोरेने प्रथम क्रमांक मिळविला. सुगम गायन स्पर्धेत सृष्टी खोत, द्वितीय क्रमांक तर चित्रकला स्पर्धेत सचिंता गुरवने तृतीय क्रमांक मिळविला.

हॅलो प्रभात

# 'विवेकानंद'मध्ये 'विज्ञान सप्ताह' साजरा

कोल्हापूर : हॅलो प्रभात

विवेकानंद महाविद्यालयातील मायक्रोबायोलॉजी विभाग व IQAC विभागातर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त दि. २४.२.२०२५ ते ०३.०३.२०२५ दरम्यान विज्ञान सप्ताह साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. सप्ताहाची सुरुवात दि. २४.०२.२०२५ रोजी इलेक्ट्रॉनिक विभाग प्रमुख डॉ. सी. बी. पाटील यांच्या हस्ते उद्घाटनाने झाली. उद्घाटना वेळी झूलॉजी विभाग प्रमुख डॉ. जी. के. सोनटक्के हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या सप्ताहात




पोस्टर, मॉडेल, मायक्रोटून, स्लोगन, एक्स्टेंपर, आगार आर्ट व फर्मेंटेड फूड अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले होते. सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद लाभला. विजेत्या विद्यार्थ्यांना चषक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सप्ताहाची सांगता बॉटनी विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभाने झाली. सर्व स्पर्धांचे नियोजन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, विभाग प्रमुख डॉ. टी. सी. गौपाले, रजिस्ट्रार श्री.आर.बी.जोग यांच्या मार्गदर्शनाखाली विभागातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी यशस्वीरित्या नियोजन केले.

# हॅलो प्रभात

10/03/2025


# बदलणाऱ्या काळातील 'सवलतींचा लाभ' घेऊन महिलांनी अधिक सक्षम व्हावे : डॉ. जुई कुलकर्णी

## विवेकानंद कॉलेजमध्ये महिला दिन साजरा

कोल्हापूर : हॅलो प्रभात



येथील विवेकानंद कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयातील महिला सबलीकरण अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, अंतर्गत तक्रार समिती, संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे महिला अभ्यासकेंद्र यांच्या वतीने आयोजित 'विकसीत भारत २०४७ : स्त्रियांचे स्थान' या विषयावरील व्याख्यानात डॉ. जुई कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी त्या म्हणाल्या, विकसनशील पासून विकसीत भारताचे स्वप्न साकारण्या-साठी प्रत्येकानी आपल्या सर्व भूमिका प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत. स्त्री पुरुष समानता निर्माण होण्यासाठी एकमेकांना परस्परपुरक सहकार्य करणे आवश्यक आहे. पारंपारिक रुढीतून बाहेर पडून माणूस म्हणून अस्तित्व टिकवणेसाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. सध्या अनेक सवलती महिलांसाठी उपलब्ध असून त्याचा लाभ घेऊन महिलांनी अधिक सक्षम व स्वावलंबी व्हावे, असे मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी हया होत्या. अध्यक्षीय मनोगतात त्या म्हणाल्या, स्त्रियांनी स्वत:मधील विविध कौशल्यांचा वापर येणाऱ्या काळाची आव्हाने स्वीकारण्यासाठी करावा व जीवनात यशस्वी होणेसाठी संवेदनशील व सक्षम मानसिकता ठेवली पाहिजे असे मत जोशी यांनी मांडले.

या कार्यक्रमासाठी डॉ. उर्मिला खोत, डॉ. कविता तिवडे व रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे बहुमोल सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. वर्षा शिंदे यांनी केले. आभार डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी मानले सूत्रसंचालन प्रा.अश्विनी खवळे यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

10/03/2025

सकाळ TODAY
कोल्हापूर, गुरुवार, २० मार्च २०२५

# विवेकानंद कॉलेजचा 'ओॲसिस'बरोबर करार

कोल्हापूर ता. १९ : विवेकानंद महाविद्यालयातील सूक्ष्मजीवशास्त्र पदव्युत्तर विभागातर्फे शिरोळ तालुक्यातील ओॲसिस ॲग्रो इंडस्ट्रीज कंपनीबरोबर सामंजस्य करार केला आहे.

राष्ट्रीय पारितोषिक प्राप्त ओॲसिस ॲग्रो इंडस्ट्रीमध्ये पर्यावरणपूरक शेतीसाठी जैविक खतांची व कीटकनाशकांची निर्मिती केली जाते. कराराअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी संयुक्त संशोधन प्रकल्प, प्रशिक्षण वर्ग, व्याख्याने आयोजित केली जातील. यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, सूक्ष्मजीवशास्त्र विभागप्रमुख डॉ. टी. सी. गोपाले, पीजी समन्वयक प्रा. व्ही. व्ही. मिसाळ, डॉ. एस. डी. माळी, डॉ. के. के. भिसे, प्रा. एस. डी. गबाले, प्रा. एस. ए. पिसे, एम. एम. नाडकर्णी, एस. एस, शेख उपस्थित होते.

20/03/25

पुढारी कोल्हापूर बुधवार, २६ मार्च २०२५

# अक्षय जाधव, अर्चित मकोटे, संकेत देवर्डेकर, ऋतुराज मेथे बनले फौजदार

## पोलिस उपनिरीक्षक परीक्षा २०२३ सर्वसाधारण गुणवत्ता यादी जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**









अक्षय जाधव अर्चित मकोटे संजय रायमाने, प्रशांत इंजर संकेत देवर्डेकर ऋतुराज मेथे-पाटील सुशांत चिंदगे

राज्य लोकसेवा आयोगाने घेतलेल्या पोलिस उपनिरीक्षक परीक्षेत कसबा बावडा येथील अक्षय जाधव, इचलकरंजी येथील अर्चित मकोटे व संजय रायमाने, गगनबावडा येथील आनंदा इंजर व राधानगरी येथील संकेत देवर्डेकर यांनी यश संपादन केले. विद्या प्रबोधिनी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे ऋतुराज मेथे-पाटील, सुशांत चिंदगे यशस्वी ठरले आहेत. हे सर्वजण आता परीक्षेत बाजी मारून 'फौजदार' बनले आहेत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या महाराष्ट्र अराजपत्रित गट 'ब' सेवा मुख्य परीक्षा २०२३ पोलिस उपनिरीक्षक पदासाठीची तात्पुरती सर्वसाधारण गुणवत्ता यादी मंगळवारी जाहीर झाली. सुमारे ३७४ जागांसाठी जाहिरात काढली होती. त्यानुसार २१८ उमेदवारांची तात्पुरती सर्वसाधारण यादी जाहीर झाली आहे. कसबा बावडा येथील मराठा कॉलनीतील अक्षय शशिकांत जाधव यांची पोलिस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली आहे. त्यांनी विवेकानंद महाविद्यालयातून बीएस्सी. ची पदवी घेतली. आई-वडील तासगाव, जिल्हा सांगली येथे शेतीची कामे करतात. बावड्यात ते चुलते यांच्याकडे शिकायला होते. तेथेचे स्वतंत्र खोली घेऊन स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासास सुरुवात केली. काही वर्ष स्पर्धा परीक्षेचा पुण्यात राहून अभ्यास केला. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात पहिल्याच प्रयत्नात यश मिळाल्याचे समाधान त्यांनी व्यक्त केले.

इचलकरंजी येथील आर्चित श्रीहरी मकोटे यांची पोलिस उपनिरीक्षक म्हणून निवड झाली असून, त्यांनी १४० रँक मिळवली आहे. विशेष मागास प्रवर्गात ते अव्वल ठरले आहेत. आर्चित यांचे वडील खासगी व्यावसायिक आहेत. त्यांनी शरद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यड्राव येथून बी.टेक पूर्ण केले. त्यानंतर स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरू केला. यापूर्वी त्यांची लिपीक, टंकलेखक, कर सहायक पदावर निवड झाली आहे. दुसऱ्या प्रयत्नात ते पोलिस उपनिरीक्षक झाले आहेत. पुढील पदाची परीक्षा देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

ऋतुराज रघुनाथ मेथे-पाटील यांनी पोलिस उपनिरीक्षक म्हणून ६५ वी रँक मिळवली. ते मूळचे अंबप पाडळी (ता. हातकणंगले) येथील आहेत. वडील शेतकरी असून आई गृहिणी आहे. २०२३ मध्ये पीएसआयची परीक्षा दिली. त्यानंतर २०२४ मध्ये आयआयएम बौधगया येथे २०२४ पासून एमबीए करीत आहेत. आता परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, यश मिळाल्याचा आनंद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

गगनबावडा तालुक्यातील खोकुर्ले पैकी पडवळवाडी येथील प्रशांत आनंदा इंजर यांनी पोलिस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली. प्रशांत अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील आहेत. असळज येथील उदयसिंह ऊर्फ बाळ पाटील विद्यालयात त्यांनी माध्यमिक शिक्षण घेतले. विज्ञान शाखेतून कोल्हापुरातील महाराष्ट्र हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये उच्च माध्यमिक शिक्षण घेतले. गगनबावड्यातील आनंदी महाविद्यालयातून त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. परीक्षेची तयारी करताना आई-वडिलांची प्रेरणा व मित्रांचे खूप सहकार्य व मार्गदर्शन मिळाल्याचे त्यांनी सांगितले. तुरंबे (ता. राधानगरी) येथील संकेत संजय देवर्डेकर यांची पीएसआय पदी निवड झाली. त्यांचे माध्यमिक शिक्षण श्री मारुतीराव वारके आबाजी विद्यालयात झाले. सोळांकुर येथील यशवंतराव पाटील महाविद्यालयातून रसायनशास्त्र विषयातून पदवी घेतली. त्यानंतर पुणे येथून परीक्षेची तयारी केली. पीएसआय म्हणून झालेल्या निवडीचा समाजाच्या हितासाठी उपयोग करणार असल्याचे त्यांनी सांगितले. संजय रायमाने हे इचलकरंजी येथील आहेत. वडिलांच्या मृत्यूनंतर आजी-आजोबा व मामांनी त्यांचा सांभाळ केला. व्यंकटेश्वरा महाविद्यालयातून बी.कॉम. पूर्ण केले. त्यानंतर संजय घोडावत विद्यापीठातून एमबीए पूर्ण केले. गेली अनेक वर्ष स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करीत आहे. त्यांना तिसऱ्या प्रयत्नात यश मिळाले. राज्यसेवा परीक्षा देऊन मोठे पद मिळविणार असल्याचे त्यांनी सांगितले.

दै० लोकमत - 29/3/2025



॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार ॥ - शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR

**(An Empowered Autonomous Institute)**

**Tarabai Park, Kolhapur**

(Accredited "A+" with CGPA 3.29 by NAAC

College with Potential for Excellence (ISO 9001-2015)

College website : www.vivekanandcollege.ac.in    Office : 0231-2658612

## POST GRADUATE (PG) ENTRANCE EXAMINATION NOTIFICATION

Online applications are invited from the eligible candidates for following **First Year Post Graduate Degree Programs** as per NEP-2020 for the **Academic Year 2025-26.**

| Sr. No. | Name of the PG Program | Intake Capacity | Sr. No. | Name of the PG Program | Intake Capacity |
|---|---|---|---|---|---|
| 1 | M. Sc. Physics | 40 | 9 | M. Sc. Biotechnology | 20 |
| 2 | M. Sc. Organic Chemistry | 40 | 10 | PG Diploma in Geoinformatics | 30 |
| 3 | M. Sc. Analytical Chemistry | 40 | 11 | M. A. Geography | 50 |
| 4 | M. Sc. Mathematics | 50 | 12 | M. A. Correctional* Administration | 20 |
| 5 | M. Sc. Statistics | 20 | 13 | Master of Rural Studies* | 20 |
| 6 | M. Sc. Applied Statistics | 20 | 14 | M. Sc. Geoinformatics* | 30 |
| 7 | M. Sc. Computer Science | 20 | 15 | M. Sc. Zoology* | 20 |
| 8 | M. Sc. Microbiology | 40 | | | |

- Program will starts after the permission of Government of Maharashtra & Shivaji University, Kolhapur.
- Direct Admission for M. A. (History) and M. Com.

**NOTE :**

- Eligibility for every program as per regulation given by UGC / Government of Maharashtra & Shivaji University, Kolhapur.
- **ONLINE FORM** of Entrance Examination will be available on the college website : www.vivekanandcollege.ac.in from 29-03-2025.
- Entrance Examination will be conducted through **ONLINE MODE.**
- Date of Entrance Examination will be declared later on the college website.
- Dates for online registration and registration fee are as follows :
  i) Upto 20th April 2025 Rs. 300/-
  ii) Upto 5th May 2025 Rs. 500/-
- Candidates are advised to visit our college website time to time for further details.

Place : **KOLHAPUR**
Date : **26-03-2025**

Sd./- **Dr. R. R. KUMBHAR**
Principal,
Vivekanand College, Kolhapur
(An Empowered Autonomous Institute)

तरुण भारत

सोमवार, ३१ मार्च २०२५

# दत्ता जाधव यांना पीएच.डी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विषयाची पीएच.डी दत्ता जाधव (रा. जाधववाडी ता. पन्हाळा) यांना प्रदान करण्यात आली. 'भारतातील विसाव्या शतकातील लोकशाही विचार आणि भारतीय राज्यघटना" या विषयाचे त्यांनी संशोधन केले. जाधव यांनी शाहू मिल कामगाराच्या कुटूंबातून येत आपले उच्चशिक्षण पुर्ण केले. ते सध्या विवेकानंद कॉलेज येथे ते अध्यापन करत आहेत. संशोधनासाठी ज्येष्ठ राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार, डॉ. रविंद्र भणगे, कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. श्रुती जोशी यांनी मार्गदर्शन केले.

